| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार**<br>**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**<br>रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१<br>Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेसनोट क्र. १६-२२** **दिनांक १७/०१/२०२२**

**साकी ऑर्केस्ट्रा (गणेश भवन) बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांची कारवाई.**

दिनांक १५.०१.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाचे पोलीस अंमलदार श्री केशव शिंदे यांना त्यांचे विश्वासनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, साकी ऑर्केस्ट्रा (गणेश भवन) बारमध्ये महिला सिंगर पुरुष ग्राहकांशी लगट करुन हिंदी चित्रपटातील गाण्यावरती बिभत्सपणे अश्लिल नृत्य करुन ग्राहकांना उत्तेजित करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने वपोनि श्री एस. एस. पाटील व अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथक यांनी माहितीची सत्यता पडताळुन साकी ऑर्केस्ट्रा (गणेश भवन) बार येथे २१.४५ वा. छापा टाकला असता बारमध्ये महिला सिंगर ह्या तोकडे व उत्तान कपडे परिधान करुन अर्धवट अंग उघडे ठेवुन बिभत्स व अश्लिल नृत्य करीत असल्याचे व सदर कृत्यास साकी ऑर्केस्ट्रा बारचे (गणेश भवन) चालक/मालक (पाहिजे आरोपी), मॅनेजर कम कॅशिअर, वेटर व वादक हे आपआपसात संगणमत करुन स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता प्रोत्साहन देत असल्याचे व ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनामध्ये असलेले ग्राहक देखील महिला सिंगर सोबत नृत्य करीत असतांना आढळुन आल्याने सदर छापा कारवाईमध्ये एकुण १५,२८०/- रुपये जप्त करुन साकी ऑर्केस्ट्रा बार (गणेश भवन) चे चालक/मालक (पाहिजे आरोपी), मॅनेजर कम कॅशिअर, वेटर, महिला सिंगर, वादक व ग्राहक असे एकुण २८ इसमांविरुद्ध पोलीस अंमलदार/१२११८ श्री. केशव शिंदे नेमणुक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. १६/२०२२, भा.द.वि.सं. कलम २९४, १०९, ११४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संपतराव पाटील, पोहवा/९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९५००८ रामचंद्र पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे, मपोना/०३०१५ वैष्णवी यंबर, चा.पोना/०६१०६ सम्राट गावडे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---